# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१९

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### कणकवली (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील ट्रामाकेअर सेंटरसाठी वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे मंजूर झालेली नसल्याबाबत

**(१) १३१७ (२३-१२-२०१४). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कणकवली (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील ट्रामाकेअर सेंटरसाठी निधी मंजूर झाला असून वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे अद्याप मंजूर झालेली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ट्रामा केअर सेंटर केव्हापर्यंत कार्यान्वित होण्याचे अपेक्षित आहे,

(३) असल्यास, सदर ट्रामा केअर सेंटरच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.

सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. पदनि-२०१५/प्र.क्र.२७२/आरोग्य-३, दि.२ जानेवारी, २०१७ च्या शासन निर्णयान्वये वैद्यकीय अधिकाऱ्यांसह ट्रामा केअर युनिटसाठी प्रत्येकी १५ पदे मंजूर आहेत.

(२) व (३) विशेषतज्ञ व वैद्यकीय अधिकारी पदे व कर्मचाऱ्यांची पदे भरण्याबाबतची आणि ट्रामा केअर सेंटरसाठी उपकरणे उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

### अलिबाग (जि.रायगड) येथील जिल्हा रुग्णालयाच्या जुन्या इमारतीच्या जागी नविन इमारत बांधण्याबाबत

**(२) ८१६० (०७-०४-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

वि.स. ५५९ (२)

(१) अलिबाग (जि.रायगड) येथील जिल्हा रुग्णालयाच्या जुन्या इमारतीच्या जागी नविन इमारत बांधण्याची शासनाची शिफारस टाळून जुन्याच इमारतीच्या दुरुस्तीवर कोट्यवधी रुपये खर्च करण्याची शिफारस करुन हजारो रुग्णांचे आरोग्य धोक्यात आणणा-या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या व सार्वजनिक आरोग्य विभागातील संबंधित अधिका-यांनी चौकशी करावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान मा.मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने आवश्यक ती कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०२-२०१९) :**(१) हे खरे आहे.
स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि. २०/२/२०१४ च्या निवेदनाद्वारे संबंधिताविरुध्द चौकशीची मागणी केली आहे.
(२) अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयाचे बांधकाम कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अलिबाग तसेच मुख्य अभियंता, सा.बां.प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांचेकडून करण्यात आल्याने याप्रकरणी मा. स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी केलेल्या निवेदनातील मागणीच्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता सा.बां. विभाग, अलिबाग आणि मुख्य अभियंता सा.बां. विभाग, अलिबाग आणि मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांचेकडून जिल्हा शल्य चिकित्सक, रायगड यांच्या स्तरावरुन दिनांक १७.३.२०१५ व तद् नंतरच्या पत्रान्वये स्पष्टीकरण मागविण्यात आले आहे. तथापि, त्यांचेकडून अद्यापही माहिती अप्राप्त असल्याने याबाबत प्रधान सचिव (सार्वजनिक बांधकाम विभाग) यांना याप्रकरणी चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

तसेच सदर रुग्णालयाचे बांधकाम प्रकरणी आरोग्य विभागाच्या अनुषंगाने आयुक्त तथा अभियान संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांना चौकशी करुन अहवाल सादर करण्यास कळविण्यात आले आहे. अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

सद्य:स्थितीत कार्यकारी अभियंता (सा.बां.वि.) अलिबाग यांनी जिल्हा रुग्णालय अलिबाग येथील आंतररुग्ण इमारतीची प्रत्यक्ष पाहणी केली असून रुग्णालयाच्या इमारतीच्या दुरुस्तीच्या कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील आदिवासी क्षेत्रातील अतिदुर्गम भागात कार्यरत असलेल्या मानसेवी वैद्यकीय अधिका-यांच्या सेवा नियमित करण्याबाबत

**(३) ११८४२ (१०-०४-२०१५). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

वि.स. ५५९ (३)

(१) राज्यातील आदिवासी क्षेत्रातील १६५ जिल्हयांमध्ये नवसंजीवनी योजनेंतर्गत अतिदुर्गम भागात कार्यरत असलेल्या १७२ मानसेवी वैद्यकीय अधिका-यांच्या सेवा नियमित करण्यासाठी आरोग्य सेवा संचालनालयाने दिनांक ३१ मे, २०१४ रोजी वा त्यासुमारास शासनास प्रस्ताव सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मानसेवी वैद्यकीय अधिका-यांची सेवा नियमित करण्यासाठी राज्यातील लोकप्रतिनिधींनी माहे ऑगस्ट, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०२-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.
मानसेवी वैद्यकीय अधिकाऱ्यांची १७२ पदे विहित शासकीय नियमानुसार नियमित करण्याबाबतचा प्रस्ताव संचालक, आरोग्य सेवा संचालनालय यांचे दि.३१.०५.२०१४ च्या पत्रान्वये प्राप्त झाला होता. तसेच, मानसेवी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सेवा, नवीन पदे निर्माण करुन नियमित करण्याबाबतचा प्रस्ताव, संचालक, आरोग्य सेवा संचालनालय यांच्या दि.३०.०६.२०१८ च्या पत्रान्वये प्राप्त झाला होता.
(२) हे खरे आहे.
(३) मानसेवी वैद्यकीय अधिकारी यांच्या सेवा नियमित करण्यासंदर्भात शासनाने धोरणात्मक निर्णय घेतलेला नाही. यास्तव मानसेवी वैद्यकीय अधिकाऱ्यांसाठी पदनिर्मिती करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या दि.११.१०.२०१८ च्या पत्रान्वये अमान्य करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयात आरोग्य विभागाने बांधलेली निवासस्थाने रिक्त असल्याबाबत**

**(४) १६९३३ (१७-०८-२०१५). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयात आरोग्य विभागाच्या वतीने वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी बांधण्यात आलेली निवासस्थाने सध्या रिक्त असल्याचे माहे मे, २०१६५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू निवासस्थाने ही चुकीच्या ठिकाणी व नियोजनशुन्य पध्दतीने बांधण्यात आली असल्याने ही निवासस्थाने रिक्त असून यावर शासनाने कोटयावधी रुपये खर्च केले असून ग्रामीण रुग्णालयापासून अर्धा कि.मी. अंतरावर असून या निवासस्थानाला लागूनच स्मशामभूमी आहे तसेच सध्या नव्याने रजू झालेल्या कर्मचा-यांनी या निवासस्थाकडे दुर्लक्ष केल्याने निवासस्थांनाची दारे, लोखंड खिडक्या, फरशी, विद्युत बल्ब, लोखंडी गज याची चोरी

झाली आहे हे पाहता शासनाने त्वरीत याबाबत आवश्यक ती कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,
(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०२-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) ग्रामीण रुग्णालय, उमरी पासून अर्ध्या कि.मी. अंतरावर वर्ग-३ व वर्ग-४ ची निवासस्थाने बांधण्यात आली असून, निवासस्थांनाच्या बाजूस स्मशान भूमी असल्याने, कर्मचारी तेथे राहण्यास तयार झाले नाहीत. त्यामुळे, अज्ञात चोरांनी दारे, खिडक्या, लोखंडी गज चोरुन नेले. याबाबत वैद्यकीय अधिक्षकांनी पोलिस स्टेशन उमरी येथे तक्रार दाखल केली आहे. तसेच सदर निवासस्थानांची दुरुस्ती करुन देण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग यांना कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**निलंगा (जि.लातूर) येथे उपजिल्हा रूग्णालयास मंजूरी देण्याबाबत**

**(५) ३५६१२ (२१-०१-२०१६). श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) निलंगा (जि.लातूर) येथे २०० खाटांच्या उपजिल्हा रूग्णालयास शासनाने मंजूरी दिलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू २०० खाटांच्या उपजिल्हा रूग्णालयास मंजूरी होवून आजमितीस सुमारे ६५ वर्षाहून अधिक कालावधीत लोटलेला असतानाही रूग्णालयाच्या उभारणीच्या कामास शासनाकडून सुरूवात झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू २०० खाटयांच्या उपजिल्हा रूग्णालयाच्या उभारणीच्या कामास विलंब होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) हे अंशत: खरे आहे.
शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१२/प्र.क्र.१४१/ आरोग्य-३, दि. १७ जानेवारी, २०१३ अन्वये राज्यात आरोग्य संस्था स्थापनेच्या बृहत आराखडयास मान्यता दिलेली आहे. त्यामध्ये उपजिल्हा रुग्णालय, निलंगा, जि.लातूर चे ६५० खाटांवरुन १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालयात श्रेणीवर्धन करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार रु.१८२६.४२ लक्ष किंमतीच्या बांधकामाचा आराखडा व अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. याकरीता निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

## गडहिंग्लज (जि.कोल्हापूर) येथील उप जिल्हा रुग्णालयाची झालेली दुरवस्था

**(६) ४१३८५ (१०-०५-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडहिंग्लज (जि.कोल्हापूर) येथे आजूबाजूच्या तालुक्यातील लोकांना वेळेवर उपचार मिळावेत या हेतूने १०० खाटांचे अद्ययावत सर्व सोयीनुक्त उपजिल्हा रुग्णालय उभारले गेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उपजिल्हा रुग्णालय प्रशासनाच्या योग्य नियोजन अभावी विविध समस्या उद्भवत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, आजूबाजूच्या सर्व तालुक्यातील लोकांना उपचारासाठी कोल्हापूर, बेळगाव या ठिकाणी जावे लागत असून अनेक वेळा रुग्ण प्रवासात दगावल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर उपजिल्हा रुग्णालयाच्या १०२ रुग्णवाहिका वारंवार बंद असल्याने अडगळीत पडल्या आहेत हे खरे आहे काय,

(५) असल्यास सदर उपजिल्हा रुग्णालय सुस्थितीत चालू करून रुग्णांना वेळेत उपचार मिळण्यासाठी शासन कोणती कार्यवाही करणार आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

गंभीर व अत्यवस्थ अवस्थेतील रुग्णांना छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालय, कोल्हापूर येथे संदर्भित केले जाते. बेळगांव येथे कोणताही रुग्ण संदर्भित केला जात नाही. अशा प्रसंगी प्रवासात कोणताही रुग्ण दगावलेला नाही.

(४) व (५) रुग्णालयाकडील टोल फ्री क्र.१०२ ची रुग्णवाहिका सुस्थितीत आहे. त्याप्रमाणे टोल फ्री क्र.१०८ ची रुग्णवाहिका अशा दोन रुग्णवाहिकांच्या सेवा उपलब्ध आहेत.

---

## निलंगा तालुक्यातील नवीन प्राथमिक आरोग्य केंद्राचा प्रस्ताव

**(७) ४१६२१ (१०-०५-२०१६) श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) निलंगा तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांना जोडण्यात आलेली गावे व त्यांची भौगोलिक रचना पहाता ग्रामीण भागातील सर्वसामान्य रूग्णांना आरोग्य सेवा देण्यासाठी प्रशासकीय पातळीवर अडचणी येत असल्याने नवीन प्राथमिक आरोग्य केंद्राचा प्रस्ताव मंजूरीसाठी शासनाकडे पाठविलेले असतानाही मागील ५ वर्षापासून सदर प्रस्ताव प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या नियमानुसार प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी ३० हजार एवढी लोकसंख्या असावी असा नियम असून तालुक्यातील लोकसंख्येचे प्रमाण पहाता पानचिंचोली आरोग्य केंद्र वगळता तालुक्यातील अंबुलगा, निटूर, कासारबालकुंदा, मदनसुरी, हलगरा आदी उर्वरित सर्वच आरोग्य केंद्राला क्षमतेपेक्षा जास्त गावे जोडल्याने लोकसंख्या दीडपट झाली आहे तसेच भौगोलिक परिस्थितीनुसार ग्रामीण भागातील रूग्णांना दर्जेदार सेवा देण्यासाठी गैरसोयीचे होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पंचायत समितीकडून केलेल्या सर्वेक्षणानुसार मध्यवर्ती व सोयीचे ठिकाण लक्षात घेवून निलंगा तालुक्यातील उस्तुरी, रामलिंग, मुदगड व जेवरी येथील नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र तर सरवडी, हाडोवळी येथे प्रत्येकी एका उपकेंद्राच्या निर्मितीचा प्रस्तावावर निर्णय घेण्यास विलंब होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदरहू नवीन आरोग्य केंद्र व उपकेंद्रास विनाविलंब मंजूरी होवून ती लवकरात लवकर कार्यान्वित होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०२-२०१९) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) व (४) मुदगड येथे प्राथमिक आरोग्य केंद्राचे बांधकाम सुरु आहे. सन २०११ च्या लोकसंख्येवर आधारित नवीन रुग्णालय सुरु करण्यासाठी जोड-बृहत आराखडा तयार करण्यात येत असून निलंगा तालुक्यामध्ये नवीन उस्तुरी, रामलिंग व जेवरी येथे प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच, सरवडी व हाडोळी येथे उपकेंद्र सुरु करण्याची मागणी निकषानुसार जोड-बृहत आराखडयामध्ये समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**औरंगाबाद शहरात चिकलठाणा येथील जिल्हा सामान्य रुग्णालयासोबतच मिनी घाटी या रुग्णालयातच स्त्री रुग्णालय मंजूरीबाबत**

**(८) ५७१९९ (३०-०८-२०१६) श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरात शासनाने चिकलठाणा येथील जिल्हा सामान्य रुग्णालयासोबतच २०० खाटांचे मिनी घाटी या रुग्णालयातच स्त्री रुग्णालय मंजूर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मिनी घाटी रुग्णालयाचे काम अनेक कालावधीपासून अपुरे असल्याने रुग्णांना रुग्णसेवा दिली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मिनी घाटी रुग्णालयाचे काम अपूर्ण राहण्याची कारणे काय आहेत व सदर काम किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.

चिकलठाणा येथील २०० खाटांच्या जिल्हा सामान्य रुग्णालयासोबतच स्त्री रुग्णालय मंजूर केलेले नाही. दि.१७ जानेवारी, २०१३ च्या शासन निर्णयान्वये आरोग्य संस्था स्थापनेच्या बृहत आराखडयानुसार, औरंगाबाद येथे २०० खाटांचे नवीन स्वतंत्र महिला व शिशू रुग्णालय स्थापन करण्याबाबत मंजूरी देण्यात आली आहे.

(२) व (३) जिल्हा रुग्णालय, औरंगाबाद या रुग्णालयाचे बांधकाम पुर्ण झाले असून, सदर रुग्णालयाची इमारत दि. ३ ऑक्टोबर, २०१७ रोजी जिल्हा शल्य चिकित्सक यांनी ताब्यात घेतली आहे. जिल्हा रुग्णालय, औरंगाबाद येथील बाह्यरुग्ण विभाग दि. २५ जून, २०१८ रोजी रुग्णसेवेसाठी कार्यान्वीत करण्यात आला आहे. तसेच, रुग्णालयातील ट्रामा केअर सेंटर, आंतररुग्ण विभाग, प्रसुती विभाग, शस्त्रक्रियागार विभाग, डे-केअर सेंटर, किमोथेरेपी विभाग, सोनोग्राफी विभाग, क्ष-किरण विभाग, लसीकरण विभाग, आयुष विभाग व भौतिकोपचार विभाग इ. विभाग रुग्णसेवेसाठी टप्प्याटप्प्याने कार्यान्वीत करण्यात आले आहेत. अपघात (Casuality) विभाग सुरु करण्याची कार्यवाही निधीच्या उपलब्धतेनुसार सुरु आहे.

---

**अलिबाग जिल्हा रुग्णालयात मणक्यावरील शस्त्रक्रिये दरम्यान एका तरुणाचा झालेला मृत्यु**

**(९) ६२२५२ (३०-०८-२०१६). श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग जिल्हा रुग्णालयात मणक्यावरील शस्त्रक्रिये दरम्यान सुरज चंद्रकांत पाटील या तरुणाचा डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे संशयास्पद मृत्यु झाला असल्याचे माहे मार्च २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितावर कारवाई करण्याबाबत तसेच मृताच्या कुटुंबियाना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०२-२०१९) :** (१) होय.

(२) व (३) डॉ.चंद्रशेखर साठे, अस्थिरोग तज्ञ (कंत्राटी) यांनी पूर्वपरवानगी न घेता रूग्णालयाची दिशाभूल करून पैसे घेऊन सामान्य रूग्णालय, अलिबाग येथे रूग्णाची शस्त्रक्रिया केल्याने त्यांच्या तसेच त्यांना सहाय्य करणाऱ्या कंत्राटी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सेवा समाप्त करण्यात आल्या आहेत. डॉ.साठे यांची व्यवसाय नोंदणी रद्द करण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, मुंबई यांच्याकडे सादर करण्यात आला आहे. डॉ.चंद्रशेखर साठे, अस्थिरोगतज्ञ यांच्या वकीलामार्फत या प्रकरणी परिषदेस खुलासा प्राप्त झाला असून, या संदर्भातील प्रशासकीय बाबी पूर्ण झाल्याचे व सदर प्रकरण लवकरच सुनावणीस ठेवण्यात येत असल्याचे महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, मुंबई यांनी दि.६.११.२०१८ च्या पत्रान्वये कळविले आहे.

मृताच्या कुटुंबियाना विभागामार्फत आर्थिक मदत करण्याची कोणतीही तरतूद नाही.

---

**मुदखेड (जि.नांदेड) येथील ग्रामीण रुग्णालयात रूग्णांची होत असलेली गैरसोय**

**(१०) ६८१४४ (१०-०१-२०१७). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुदखेड (जि.नांदेड) येथील ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक पातळीवरील औषधे, वीज, पाणी याची कमतरता असल्यामुळे रुग्णांची गैरसोय होत असल्याचे माहे जुलै, २०१६ मध्ये वा या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथे उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना योग्य उपचार मिळावा यासाठी रुग्णालयात सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०२-२०१९) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

मुदखेड (जि. नांदेड) येथील माहे जुलै, २०१६ व त्या सुमारास पाणी पातळी कमी झाल्याने बोअरवेलला पाणी उपलब्ध नव्हते. ग्रामीण रुग्णालयातील रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून आवश्यकतेनुसार टॅकरद्वारे पाणी उपलब्ध करुन देण्यात आले होते. सदर कालावधी मध्ये वीज पुरवठा अखंडीत होता व रुग्णालयातील औषधी साठा परिपुर्ण होता.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सातारा जिल्हयातील क्रांतीसिंग नाना पाटील जिल्हा शासकीय रुग्णालयातील अस्थिरोग शस्त्रक्रिया बंद असल्याबाबत**

**(११) ७०३१८ (१०-०१-२०१७). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्हयातील क्रांतीसिंग नाना पाटील जिल्हा शासकीय रुग्णालयात सध्या चार अस्थिरोग तज्ञ डॉक्टर कार्यरत असूनही तेथे सध्या अस्थिरोगाची शस्त्रक्रिया बंद असल्याने रुग्णांना स्वखर्चाने अस्थिरोग शस्त्रक्रियेसाठी पुणे येथे जावे लागत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णांची गैरसोय थांबविण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

वि.स. ५५९ (९)

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०२-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.
क्रांतीसिंग नाना पाटील जिल्हा शासकीय रुग्णालय, सातारा येथील सि.आर्म मशिन दि.२.०८.२०१६ ते २१.०९.२०१६ या कालावधीत ५१ दिवस नादुरुस्त असल्याने, या कालावधीत १७ रुग्णांना ससून रुग्णालय, पुणे येथे पुढील उपचारासाठी संदर्भित करण्यात आले होते.
(२) सदर मशिन दि.२२.०९.२०१६ पासून पुर्ववत कार्यरत केलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाशी (जि.उस्मानाबाद) येथील ग्रामीण रुग्णालयामध्ये ट्रामा केअर सेंटरची उभारणी करणेबाबत**

**(१२) ८३४६६ (१८-०४-२०१७). श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशी (जि.उस्मानाबाद) येथील ग्रामीण रुग्णालयामध्ये ट्रामा केअर सेंटरची उभारणी करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री व मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्याकडे दिनांक २० फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राष्ट्रीय महामार्ग २११ महामार्गावरील दोन ट्रामा केअर सेंटरमध्ये १२५ कि.मी.पेक्षा जास्त अंतर असल्याने अपघातग्रस्त रुग्णांना उपचार मिळण्यास विलंब होतो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने या संदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
राष्ट्रीय महामार्ग २११ महामार्गावर जिल्हा रुग्णालय उस्मानाबाद, प्राथमिक आरोग्य केंद्र येडशी, प्राथमिक आरोग्य केंद्र येरमाळा, ग्रामीण रुग्णालय वाशी, प्राथमिक आरोग्य केंद्र पारगांव, प्राथमिक आरोग्य केंद्र चौसाळा, ग्रामीण रुग्णालय मांजरसुबा व जिल्हा रुग्णालय, बीड ह्या आरोग्य संस्था कार्यरत असल्याने अपघातग्रस्त रुग्णांना वेळेवर उपचार मिळण्यास मदत होते.
(३) वाशी, जि.उस्मानाबाद येथील ग्रामीण रुग्णालयामध्ये ट्रामा केअर सेंटरची उभारणी करण्याकरीता प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सांगली जिल्हयामध्ये कर्करोगाचे रुग्णामध्ये झालेली वाढ

**(१३) ९००८६ (१९-०८-२०१७). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयामध्ये मागील काही दिवसापासून कर्करोगाच्या रुग्णांमध्ये मोठया प्रमाणात वाढ होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्करोगावरील उपचाराच्या सोई सुविधा सर्व ठिकाणी नसल्यामुळे तसेच उपचार महाग असल्यामुळे महागडया उपचारामुळे अनेक कर्करोगाचे रुग्ण मृत्युमुखी पडत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सांगली येथे मंजूर असलेल्या शासकीय कर्करोग रुग्णालयाचे काम सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०२-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) सांगली जिल्हयातील गोरगरीब कर्करोगाचे रुग्णांना उपचार करण्याकरीता पद्मभूषण वसंतदादा पाटील शासकिय रुग्णालय, सांगली व शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, मिरज येथे मोफत उपचार केले जातात. तसेच खाजगी रुग्णालयांमार्फत महात्मा फुले जनआरोग्य योजना तसेच मुख्यमंत्री सहाय्यता निधीअंतर्गत मोफत उपचार केले जातात. सद्यस्थितीत असे कर्करोग रुग्णालयाचे काम सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुण्यातील प्रत्यारोपण प्राधिकार समितीने प्रत्यारोपणाचा प्रस्ताव पोलीसांकडे पाठविला नसल्याबाबत

**(१४) ९१६८८ (१९-०८-२०१७). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यामध्ये सन २०१२ पासून १० यकृत, ३ हृदय व मुत्रपिंडाचे प्रत्यारोपण करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, पुण्याच्या प्रत्यारोपण प्राधिकार समितीने एकही प्रस्ताव सन २०१४ पासून पोलीसांकडे पाठविला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंत दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०२-२०१९) :** (१) विभागीय प्रत्यारोपण समन्वय समिती, पुणे यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार सन २०१२ पासून आजतागायत पुणे येथे यकृत प्रत्यारोपण - ११६, हृदय प्रत्यारोपण-०७, आणि मुत्रपिंड प्रत्यारोपण-२०३ करण्यात आले आहे.
(२) प्रत्यारोपण प्रकरणांमध्ये प्रत्यारोपण प्राधिकार समितीस निर्णय प्रक्रीयेदरम्यान गरज भासल्यास संबधित प्रकरण पोलीसांकडे पाठविण्यात येते. प्रत्यारोपण प्राधिकार समिती,पुणे यांनी सन २०१४ पासून आजतागायत एकूण ३ मुत्रपिंड प्रत्यारोपण प्रकरणे पोलीसांकडे पाठविलेली आहेत.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**परांडा (जि.उस्मानाबाद) येथील उपजिल्हा रुग्णालयातील असुविधेबाबत**

**(१५) ९१९३८ (१९-०८-२०१७). श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परांडा (जि.उस्मानाबाद) येथील उपजिल्हा रुग्णालयातील असुविधेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांचेकडे दिनांक २८ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) सार्वजनिक बांधकाम विभागाकडून रुग्णालयाची डागडुगी करुन ड्रेनेज लाईन व प्लंबीग लाईन दुरुस्त करण्यात आली. तसेच, परांडा नगरपरिषदेकडून पाणी पुरवठा सुरळीत सुरु झाला असून वायरमन कडून दुरुस्ती करण्यात आलेली आहे.

रुग्णालयात सध्या स्त्रीरोग, बालरोग, दंत चिकित्सा विशेषज्ञ सेवा देण्यात येत आहेत. उपलब्ध नसलेल्या विशेषज्ञ सेवा, खाजगी क्षेत्रातील विशेष तज्ञ यांना रुग्णालयात कॉल बेसीसवर बोलवून रुग्णसेवा देण्यात येत आहेत. रुग्णांची सोनोग्राफी करण्यासाठी खाजगी सोनोग्राफी विशेषज्ञ यांचेशी करार करुन करार तत्वावर सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. रुग्णालयात अत्यंत कमी प्रमाणात पुरवठा झालेली व तुटवडा असलेली औषध रुग्णांच्या गरजेनुसार तात्काळ स्थानिक स्तरावरुन उपलब्ध करुन रुग्ण सेवा करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रावेर, यावल, भुसावळ (जि. जळगाव) तालुक्यातील जिल्हा क्षयरोग कर्मचाऱ्यांना वेतन वाढ न मिळाल्याबाबत**

**(१६) ९२३७३ (१९-०८-२०१७). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रावेर, यावल, भुसावळ (जि. जळगाव) तालुक्यातील जिल्हा क्षयरोग कर्मचारी यांना शासन निदेशानुसार वेतन वाढ न मिळाल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तालुक्यांमधील कर्मचाऱ्यांना वेतनवाढी पासून वगळण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०२-२०१९) :** (१) होय.

(२) नाही,

सदर तालुक्यातील कर्मचाऱ्यांना दि.३१ मार्च २०१८ रोजी वेतन वाढ व त्यावरील फरकाची रक्कम अदा करण्यात आली आहे. सदर कालावधीची आज रोजी कुठल्याही प्रकारची वेतन वाढ प्रलंबीत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उस्मानबाद जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालय व नळदुर्ग तालुक्यातील ग्रामीण रूग्णालयाची इमारत बांधकामाबाबत**

**(१७) ९२८२० (१९-०८-२०१७). श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्ह्यातील जिल्हा रूग्णालयात तसेच नळदुर्ग तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयाची इमारत व कर्मचारी वसाहतीच्या बांधकामास शासनाने मंजूरी देऊनही अद्यापही उक्त इमारतीच्या कामास सुरूवात झाली नसल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रुग्णालयाची इमारत काम पूर्ण करण्याबाबत नागरिकांनी व स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री व मा.आरोग्य मंत्री यांच्याकडे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.
उस्मानाबाद येथील जिल्हा रुग्णालयाच्या आंतररुग्ण व बाह्यरुग्ण इमारतीचे बांधकाम आणि नळदुर्ग येथील ग्रामीण रुग्णालयाचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.
(२) हे खरे आहे.
(३) जिल्हा रुग्णालयाच्या आंतररुग्ण व बाह्यरुग्ण इमारतीच्या Framed structure flooring, आतील व बाहेरील प्लास्टरचे काम पूर्ण झाले असून दरवाजे, रंगकाम, external sanitary work प्रगतीपथावर आहे. तसेच, नळदुर्ग येथील प्रस्तावित ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालयाच्या बांधकामाची सद्य:स्थिती पुढीलप्रमाणे आहे:-
१) Main Building :- आर.सी.सी.चे काम पूर्ण, विट बांधकाम प्रगतीत
२) Under Ground Water Tank:- काम पूर्ण
३) Elevated Storage Tank :- आर.सी.सी. काम प्रगतीत
४) Type-१ Quarter (१२ nos):- आर.सी.सी. काम पूर्ण
५) Type-२ Quarter (२६ nos):- आर.सी.सी. काम पूर्ण, विट बांधकाम प्रगतीत
६) Type-३ Quarter (७ nos):- आर.सी.सी. काम पूर्ण, विट बांधकाम प्रगतीत
७) Type-४ Quarter (१ nos):- आर.सी.सी. काम पूर्ण, विट बांधकाम, फरशी प्लास्टर पूर्ण Water supply and sanitary प्रगतीत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईच्या उपनगरीय रेल्वे सेवा व रस्त्यावरील वाहतूकीचा ताण कमी करण्यासाठी जलवाहतूक सेवा सुरू करण्याबाबत

**(१८) ९५४१७ (०६-०१-२०१८). श्री.संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईच्या उपनगरीय रेल्वे सेवेवरील आणि रस्त्यावरील वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी मुंबई, नवी मुंबई, ठाणे, वसई-विरार, मीराभाईंदर, कल्याण, डोंबिवली, भिवंडी या महानगरपालिकांच्या क्षेत्रात जलवाहतूक सेवा सुरु करण्यासंबधीच्या केंद्र शासनाकडे सन २०१६ मध्ये पाठविण्यात आलेल्या प्रस्तावास अद्याप मान्यता मिळालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जलवाहतूक सर्वेसाठी वसई, भाईंदर, ठाण्यात घोडबंदर, कोलशेत तसेच नवी मुंबईत वाशी, करावे, सीबीडी बेलापूर व दिवा, भिवंडी, कल्याण, मुलुंड येथे जेट्टी बांधण्यासाठी जागा निश्चित करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त जलवाहतुकीच्या प्रस्तावास केंद्र शासनाची मान्यता मिळविण्यासाठी शासन स्तरावरून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०२-२०१९) :** (१), (२), (३) व (४) मुंबईच्या उपनगरीय रेल्वे सेवेवरील आणि रस्त्यावरील वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी जलवाहतुक सेवा सुरू करण्यासाठी खालील सविस्तर प्रकल्प अहवाल प्रस्ताव महानगरपालिकेतर्फे तयार करण्यात आले आहे:-

- प्रथम टप्पा:- जलवाहतुक मार्ग क्र.६५३ करिता कोलशेत येथे मल्टीमोडल ट्रान्सपोर्ट हब व ९ ठिकाणी- वसई, मिराभाईंदर, घोडबंदर, नागला, काल्हेर, अंजूर दिवे, पारसिक, डोंबिवली (ठाकूर्ली) व कल्याण या ठिकाणी जेट्टी बांधणे आणि अनुषंगिक सुविधा पुरविण्याचे प्रस्तावित आहे.
- द्वितीय टप्पा:- ठाणे - मुंबई दरम्यान १० ठिकाणी (साकेत, कळवा, विटावा, मीठबंदर, ऐरोली, वाशी, ट्रॉम्बे, एलिफंटा, फेरीव्हार्फ, गेट वे ऑफ इंडिया) व ठाणे - नवी मुंबई दरम्यान ८ ठिकाणी (वाशी, नेरुळ, बेलापूर, तळोजा, जुई गाव, पनवेल, जे.एन.पी.टी. आणि मोरा) जेट्टी बांधणे आणि अनुषंगिक सुविधा पुरविण्याचे प्रस्तावित आहे.
- उक्त सविस्तर प्रकल्प अहवालास भारतीय अंतर्देशीय जलमार्ग प्राधिकरण, दिल्ली यांनी मान्यता दिली आहे. जलमार्ग क्र. ६५३ जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट यांना निहित असल्याने, सदर प्रकल्प अंमलबजावणीसंदर्भात जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट यांना ठाणे महानगरपालिकेशी संपर्क साधून पुढील कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.
- ठाणे महानगरपालिकेने दिनांक ०६.१२.२०१८ च्या पत्रान्वये जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट यांना आवश्यक पुढील कार्यवाही करण्याची विनंती केली आहे.

---

**राज्यात आरोग्य विभागात पदे रिक्त असल्याबाबत**

**(१९) ९६०९५ (२७-१२-२०१७). श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.धैर्यशिल पाटील (पेण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आरोग्य विभागांतर्गत १२,९०५ आरोग्य संस्था कार्यान्वित असून या संस्थांमध्ये गट 'अ' ते गट ड संवर्गाची एकूण ५३,६२८ मंजूर पदांपैकी ३८,४३३ पदे भरण्यात आली असून, अद्यापही १५,१९५ पदे रिक्त असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रिक्त पदांमुळे आरोग्य विभागातील कार्यरत असलेल्या डॉक्टरांवर ताण पडत असल्यामुळे राज्यातील एकूण १६ आदिवासी जिल्ह्यातील सन २०१६-१७ या वर्षभरातील बालमृत्यूंची संख्या २८१८ झाली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, आरोग्य विभागातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत तसेच आरोग्य केंद्राची दुरुस्ती व देखभाल करण्याबाबत मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा यांनी मा.आरोग्य मंत्री यांना दिनांक २५ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास पत्र पाठवून विनंती केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार बालमृत्यूचे प्रमाण रोखण्यासाठी तसेच आरोग्य केंद्राच्या देखभाल व दुरुस्ती करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे,

(२) हे खरे आहे

(३) आरोग्य विभागातील जिल्हा शल्यचिकित्सक संवर्गातील ५९ पदे पदोन्नतीने भरण्यात आली आहेत. तसेच महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा,गट-अ (वेतनश्रेणी रु. १५६००-३९१०० ग्रेड पे रु. ६६०० ) मधील जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी व विशेषज्ञ संवर्गातील रिक्त पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यकक्षेतून दि. ३०.९.२०२१ पर्यंत वगळून ती पदे स्वंतत्र निवड मंडळामार्फत भरण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे. त्यानुसार स्वतंत्र निवड मंडळाची स्थापना करण्यात येऊन पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच पदोन्नती कोटयातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (ग्रेड पे रु. ५४००) मधील ८७७ रिक्त पदे भरण्यासाठी दि. २७.१२.२०१८ रोजी जाहिरात प्रसिध्द केली असून पुढील कार्यवाही सुरु आहे.

गट-क व गट-ड संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही उपसंचालक स्तरावर सुरु आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्राची दुरुस्ती करण्याची कार्यवाही जिल्हा परिषद स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

(५) बालमृत्यूचे प्रमाण रोखण्यासाठी आरोग्य विभागामार्फत संस्थात्मक प्रसूती, नियमित लसीकरण, नवजात काळजी कक्ष, एचबीएनसी व इन्टेनसिफाइड एचबीएनसी, जीवनसत्व अ व जंतनाशक मोहिम, बाल उपचार केंद्र, पोषण पुनर्वसन केंद्र, मानव विकास कार्यक्रमांतर्गत तज्ञांमार्फत मातांची व बालकांची तपासणी व उपचार, नवसंजीवनी कार्यक्रमांतर्गत मातृत्व अनुदान योजना, भरारी पथकामार्फत आरोग्य तपासणी व उपचार, दायी बैठक योजना इत्यादी राबविण्यात येत आहेत. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्राची बांधकामे लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचना सर्व जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

---

**भंडारा जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालय, तालुका रुग्णालये व प्राथमिक आरोग्य केंद्रातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(२०) १०१५२५ (०४-०१-२०१८). श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यात जिल्हा सामान्य रुग्णालय व तालुक्यातील रुग्णालयामध्ये साथीच्या रोगाची लागण झालेल्या रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली असल्याचे माहे सप्टेंबर २०१७ मध्ये वा त्या दरम्यान अखेरीस निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णांवर योग्य वेळी औषधोपचार व्हावा यासाठी शासनाने जिल्हा सामान्य रुग्णालय व तालुक्यातील रुग्णालयांमध्ये तातडीने औषधी पुरवठा करण्याचे निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, साथीच्या रोगाचे वाढते प्रमाण लक्षात घेता जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालय, तालुका रुग्णालये व प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टरांची रिक्त पदे तातडीने भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

तथापि, साथरोगावरील आवश्यक औषधसाठा जिल्ह्यातील सर्व आरोग्य केंद्रांमध्ये पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहे.

(३) जिल्हा रुग्णालय, तालुका रुग्णालये व प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टरांची रिक्त पदे भरण्याकरीता खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे / येत आहे.

भंडारा जिल्ह्यातील प्रा.आ.केंद्रे आणि जिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय येथील रिक्त पदांची स्थिती पुढीलप्रमाणे

वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे मंजूर पदे भरलेली पदे रिक्त पदे

| वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| जि.प. स्तर | ७५ | ६२ | १३ |
| राज्यस्तर | ७९ | ६४ | १५ |
| एकूण | १५४ | १२६ | २८ |

• दि.१६.११.२०१६ च्या शासन आदेशान्वये भरती प्रक्रिया राबवून भंडारा जिल्ह्यातील वैद्यकीय अधिकाऱ्याची ६ पदे भरण्यात आली आहेत.

• शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून एम.बी.बी.एस. उत्तीर्ण झालेल्या बंधपत्रित उमेदवारांना बंधपत्रीत वैद्यकीय अधिकारी म्हणून नियुक्ती देण्यात येत आहे.

• आरोग्य संचालनालयाच्या दि.०८.११. २०१७ च्या पत्रान्वये वैद्यकीय अधिकारी गट-अ यांची भरती प्रक्रिया जिल्हाधिकारी स्तरावर पुन्हा सुरु करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

• वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सेवांतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेतल्यामुळे रिक्त राहणाऱ्या पदांबाबत पर्यायी व्यवस्था करण्यासंदर्भातही कार्यवाही करण्यात आली आहे.

• गट-ब संवर्गातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे पाचपाखाडी (जि.ठाणे) येथे नियमबाह्यपणे निवासी इमारतींचे बांधकामे होत असल्याबाबत**

**(२१) १०२२१७ (२६-१२-२०१७). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे (जि. ठाणे) पाचपाखाडी येथील विकासक मे. आशार रिअेल्टर्स यांच्या सर्व्हे क्र. २५४ पै, २५६ पै, २७७ पै, २७८ पै, २७९ पै व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची प्लॉट क्र. डी-२ यावर निवासी बांधकामास भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम ३५ (३) अन्वये तत्कालिन वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली यांचेकडून दि. ११ नोव्हेंबर, २००५ रोजी नोटीसा बजावण्यात येऊनही विकासकाने त्यांची पुर्तता न करता अधिकाऱ्यांच्या संगनमताने निवासी इमारतींची बांधकामे सुरु असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विकासकांकडून बांधण्यात येणाऱ्या भूखंडापैकी सर्व्हे क्र. २७५/३, २७५/४, २६५, १६०/१, १६०/३, ३७३ १ ते ३ व ३७४ १ ते ४ या जमिनींवर एमआयडीसी असा शेरा असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ७/१२ वरील उताऱ्यावर २५४(१) व २५६(अे) पै या जमिनीवर एमआयडीसी च्या भूसंपादनाकरिता समाविष्ट असल्याबाबतचा शेरा नमूद असूनही विकासकाने विभागाची परवानगी न घेता अनधिकृत बांधकामे केल्याचे निदर्शनास येऊनही जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येत आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त दोन्ही प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार नियमबाह्य पध्दतीने अधिकाऱ्यांच्या संगनमताने निवासी इमारतींचे बांधकाम करणाऱ्या व शासनाच्या करोडो रुपयांच्या महसूलांचे नुकसान करणाऱ्या विकासकांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२६-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.

दिनांक ११.११.२००५ रोजीच्या पत्रान्वये दिनांक ३०.०८.१९७५ पूर्वी ज्या क्षेत्राला भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम ३५(३) अन्वये नोटीसा बजावण्यात आल्या आहेत त्या क्षेत्राच्या तपशिलामध्ये मे. आशार रिअेल्टर्स यांच्या सर्व्हे क्र. २५४ पै, २५६ पै, २७७ पै, २७८ पै, २७९ पै चा उल्लेख नाही.

(२) होय हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उदभवत नाही.

---

**मोर्शी (जि.अमरावती) येथील उपजिल्हा रुग्णालयातील रिक्त जागा भरण्याबाबत**

**(२२) १०३०२१ (०४-०१-२०१८). डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोर्शी (जि.अमरावती) येथील उपजिल्हा रुग्णालयातील येथील १६ रिक्त जागा तातडीने भरण्यात याव्यात अशी मागणी लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ३० एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य यांचेकडे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२५-०२-२०१९) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

मोर्शी उपजिल्हा रुग्णालय येथील १६ रिक्त होती. त्यापैकी सन २०१८ ऑक्टोबरपर्यंत ३ पदे भरली आहेत व उर्वरित पदे एनएचएम/आर.बी.एस.के. व एन सी.डी विभागामार्फत कंत्राटी स्वरुपात भरण्यात आली व रुग्णसेवा सुरळीतपणे देण्यात येत आहे. क व ड वर्गाची पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात अपघातग्रस्तांना तातडीने मदत मिळण्याकरीता आरोग्य विभागाने तयार केलेला प्रस्तावाबाबत**

**(२३) १०५१४८ (३१-०३-२०१८). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अपघात ग्रस्तांना तातडीने मदत मिळावी याकरिता आरोग्य विभागाने दिल्ली, कर्नाटक, केरळच्या धर्तीवर तयार केलेला प्रस्ताव गेल्या ५ ते ६ महिन्यांपासून वित्त विभागाच्या मंजुरीविना प्रलंबित असल्याची बाब माहे जानेवारी २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्ताव प्रलंबित असण्याची कारणे काय आहे,

(३) तसेच प्रस्तावातील त्रुटी तातडीने पूर्ण करून प्रस्तावास मान्यता देणेबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०२-२०१९) :** (१) स्व.बाळासाहेब ठाकरे रस्ते अपघात विमा योजनेस दिनांक ७ जून,२०१६ च्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये तत्वत: मान्यता देण्यात आली आहे.

(२) प्रकरणी पुढील कार्यवाही सुरू आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील अंगणवाडी कर्मचा-यांच्या मानधनात वाढ करण्याबाबतचा निर्णय

**(२४) १०५३६५ (०४-०४-२०१८). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.मोहन फड (पाथरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.अबू आजमी (मानखुर्द शिवाजीनगर), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २ लाख अंगणवाडी कर्मचा-यांना सेवा ज्येष्ठततेनुसार मानधन वाढ देण्याची मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक ५ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास जाहीर केले असून त्यास तीन महिन्याचा कालावधी होऊनही अद्‌याप शासनाने याबाबतचा शासन निर्णय जारी केला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, राज्य शासनाने अद्‌याप शासन निर्णय जारी न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त शासन निर्णय अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-०२-२०१९) :** (१), (२), (३) व (४) अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका यांच्या मानधनात / भाऊबीज भेट रक्कमेत दिनांक २३/०२/२०१८ च्या शासन निर्णयान्वये वाढ करण्यात आली आहे.

---

**वाशिम जिल्ह्यात नेत्रविहीनता व अधुदृष्टी या नेत्र रुग्णांचे वाढते प्रमाण**

**(२५) १०५७७४ (०७-०४-२०१८) श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेत्र विहीनता व अधुदृष्टी या नेत्र रुग्णांचे प्रमाण जगात एक लाखामागे १३ रुग्ण असे असताना वाशिम जिल्ह्यात हे प्रमाण सुमारे २७ हून अधिक असल्याची बाब वाशिम येथील एका नेत्र रोग तज्ञांने केलेल्या सर्वेक्षणात माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार नेत्र रुग्णांचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. एकनाथ शिंदे (२२-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) होय, या संदर्भात संचालनालयामार्फत ५ तज्ञांची समिती गठित करुन चौकशी करण्यात आली.

(३) नेत्रहिनता व अधुदृष्टी हा आजार मुख्यत: अनुवांशिक बदलामुळे (Gene Mutation) तसेच नात्यामध्ये विवाह Vitamin A Deficiency, Gestational Acquired Infection, Thalidomide व Warfarin औषधी जंतुनाशके व क्ष-किरणांच्या सान्निध्यामुळे होतो. या आजाराचे प्रमाण कमी करण्याकरीता शासकीय रुग्णालयामध्ये १. Vitamin A Supplements दिले जाते.

२. Thalidomine व Warfarin चा गरोदरपणात उपयोग टाळला जातो.

३. गरोदर स्त्रियांचे क्ष-किरणांपासून संरक्षण केले जाते.

---

**राजापूर (जि.रत्नागिरी) येथील ग्रामीण रुग्णालयात पाणी टंचाईमुळे शस्त्रक्रिया अन्यत्र कराव्या लागत असल्याबाबत**

**(२६) १०६१०२ (३१-०३-२०१८). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर (जि.रत्नागिरी) येथील ग्रामीण रुग्णालयात दरवर्षी पाणी टंचाईमुळे कुटुंबकल्याण व अन्य शस्त्रकिया अन्यत्र कराव्या लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त ग्रामीण रुग्णालयाची पाणी टंचाई लक्षात घेऊन रुग्णालय परिसरात विंधन विहिरीची गेल्या कित्येक वर्षापासून मागणी केली जात असून त्यासंदर्भातील प्रस्ताव वरिष्ठ पातळीवर पाठविण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रस्तावावर शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२५-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही. राजापूर परिसरात दरवर्षी मार्च ते मे महिन्यात पाणी टंचाई भासत असली तरी रुग्णालयासाठी पुरेसे पाणी उपलब्ध होत असल्याने तेथील कुंटुंबकल्याणसह अन्य शस्त्रक्रीया अन्यत्र कराव्या लागत नाहीत. सर्व शस्त्रक्रीया ग्रामीण रुग्णालय राजापूर येथे केल्या जातात.
(२) व (३) हे खरे आहे.

ग्रामीण रुग्णालय राजापूर साठी मुबलक पाणी पुरवठा करण्या करीता जिल्हा नियोजन समीती रत्नागिरी यांनी २७.२९ लाख निधीस प्रशासकीय मंजूरी मिळाली असून त्यापैकी २३.६५० लाख निधी नगरपरिषद राजापूर यांच्याकडे निधी वर्ग करण्यात आला आहे. नगरपरिषद राजापूर यांच्या स्तरावर पुढील कार्यवाही चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा व मोताळा तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील पाणी तपासणी नमुन्याच्या चाचण्याबाबत**

**(२७) १०७६१० (३१-०३-२०१८). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा व मोताळा तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात सन २०१७-१८ मध्ये गावांमधील पाणी नमुने तपासणीकरीता प्रयोगशाळेकडे पाठविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यापैकी किती व कोणत्या ठिकाणांचे पाणी दुषित आढळुन आले आहे,
(३) असल्यास, शासनाने याबाबत कोणती प्रतिबंधात्मक उपाययोना केली व त्यास जबाबदार असणाऱ्या संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०२-२०१९) :** (१) व (२) हे खरे आहे.

सन २०१७-१८ मध्ये बुलढाणा जिल्हायातील बुलडाणा तालुक्यातील एकूण ९४७ व मोताळा तालुक्यातील एकूण ९९८ पाणी नमूने तपासणीकरीता जिल्हा प्रयोगशाळा, बुलडाणा येथे पाठविण्यात आले होते. त्यापैकी बुलडाणा तालुक्यातील २३६ पाणी नमूने व मोताळा तालुक्यातील २६५९ पाणी नमूने दुषित आढळून आलेले आहेत.

(३) प्रतिबंधात्मक उपाययोजनेच्या अनुषंगाने वर्षातून दोन वेळा पावसाळयापूर्वी माहे मे-जून व पावसाळयानंतर माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर मध्ये सार्वजनिक पिण्याचे पाण्याच्या स्त्रोतांचे सर्वेक्षण केले जाते व दुषित पाणी स्त्रोतांवर कार्यवाही करण्याबाबत संबंधित ग्रामपंचायतीला कळविले जाते. त्यानुसार दुषित पाणी नमूने आलेल्या पाणी स्त्रोतांवर पुढील कार्यवाही ग्रामपंचायत व पाणी पुरवठा व स्वच्छता विभागामार्फत करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे लाच घेतल्याप्रकरणी दाखल झालेल्या गुन्ह्यात दोषारोपपत्र दाखल न केल्याबाबत

**(२८) १०८०२५ (२६-०४-२०१८). श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे (एसीबी) सन २०१४ ते २०१६ या काळात लाच घेतल्याप्रकरणी दाखल झालेल्या ३ ते ४ हजार प्रकरणांपैकी ८ प्रकरणात गेल्या चार वर्षापासून दोषारोपपत्र दाखल न होणे, तसेच २०१६ मध्ये २१ प्रकरणात व २०१७ मध्ये १० प्रकरणी दोषारोपपत्र दाखल करण्यात न आल्याची बाब, माहिती अधिकार कार्यकर्ते यांना दिलेल्या माहितीतून दिनांक २८ डिसेंबर २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एसीबी ने शासनाकडे वारंवार पाठपुरावा करुनही शासनाने अनेक अधिकाऱ्यांविरोधात चौकशी व गुन्हे दाखल करण्यास परवानगी दिली नसल्याची बाब उघडकीस आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१७ मध्ये शासनाने एकूण किती व कोणकोणत्या शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांविरोधात चौकशी व गुन्हे दाखल करण्याची परवानगी शासनाकडे मागितली होती, त्यापैकी किती प्रकरणी शासनाने परवानगी दिली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१९) :** (१) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे सन २०१४ ते २०१७ या चार वर्षामध्ये एकूण ४६५३६ एवढे गुन्हे दाखल झाले आहे. त्यापैकी ३७३६५ प्रकरणात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. उर्वरित गुन्हे तपासावर प्रलंबित आहे.

(२), (३) व (४) सन २०१७ मध्ये एकुण २२ प्रकरणांपैकी ८ प्रकरणी शासनाने उघड चौकशीची परवानगी दिली आहे.

---

**राज्यातील स्वाईन फ्लू रुग्णांच्या संख्येत वाढ झाल्याबाबत**

**(२९) १०८३०७ (३१-०३-२०१८). श्री.अबू आजमी (मानखुर्द शिवाजीनगर), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील स्वाईन फ्लू रुग्णाची संख्या माहे, डिसेंबर २०१७ च्या पहिल्या पंधरवड्यात ४ हजार पेक्षा जास्त वाढली होती, हे खरे आहे काय

(२) असल्यास, स्वाईन फ्लूमुळे मृत्यूमुखींचीही संख्याही दिवसेंदिवस वाढत चालली आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सदर साथ आटोक्यात आणण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०२-२०१९) :** (१) नाही.

(२) नाही.

सप्टेंबर, २०१७ ते डिसेंबर २०१७ या काळातील स्वाईन्‍ फ्ल्यूच्या मृत्युंची संख्या कमी झाली आहे.

(३) स्वाईन फ्ल्यू प्रतिबंध व नियंत्रणासाठी पुढील उपाययोजना करण्यात येते.

• फ्ल्यू सदृश्य रुग्णांचे नियमित सर्वेक्षण करणे.

• फ्ल्यू सदृष्य रुग्णांवर वर्गीकरणानुसार विनाविलंब उपचार करणे

• राज्यातील उपजिल्हा रुग्णालयात तसेच वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात विलगीकरणत कक्षाची स्थापना करणे.

• उपचार सुविधा असणाऱ्या सर्व खाजगी रुग्णालयांना स्वाईन फ्ल्यू उपचाराची मान्यता देणे.

• आर्थिकदृष्टया दुर्बळ गटातील स्वाईन फ्ल्यू रुग्णांचा व्हेंटिलेटरवरील वैद्यकीय खर्चाची शासनामार्फत प्रतिपुर्ती करण्यासाठी मुख्यमंत्री निधीतून तरतूद करणे.

• राज्यातील ५ शासकीय प्रयोगशाळांमार्फत मोफत निदान सुविधा पुरविणे.

• रेलेगेअर आणि डॉ.लाल पॅथॉलॉजी लॅब्सह इतर १९ खाजगी प्रयोगशाळांना मान्यता देणे

• खाजगी प्रयोगशाळांना मान्यता देण्यासाठी तज्ञ समित्यांची थापना करणे.

• ऑसेलटॅमीवीरचा पुरेसा साठा उपलब्ध करुन देणे.

• दुसऱ्या व तिसऱ्या तिमाहीतील गरोदर मातांसोबतच मधुमेह आणि उच्चरक्तदाब असणाऱ्या व्यक्तींना आणि आरोग्य कर्मचाऱ्यांना फ्ल्यू प्रतिबंधक लसीकरणे करणे.

• महाराष्ट्र साथरोग प्रतिबंध व नियंत्रण तांत्रिक समितीची स्थापना करणे.

• अन्न व औषध प्रशासन विभागामार्फत सर्व खाजगी औषध दुकानांमध्ये ऑसलेटॅमीवीर हे औषध उपलब्ध ठेवण्यासाठी आंतरविभागीय समन्वय ठेवणे.

• शासकीय आणि खाजगी डॉक्टरांच्या स्वाईन फ्ल्यू कार्यशाळांचे आयोजन.
• फ्ल्यू प्रतिबंधासाठी जनतेमध्ये जनजागृती करणे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### आटपाडी (जि.सांगली) तालुक्यातील शासकीय ग्रामीण रुग्णालयात रिक्त पदे असल्याबाबत

**(३०) १०८४८६ (०१-०४-२०१८). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आटपाडी (जि.सांगली) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयातील एक्सरे टेक्निशियनचे पद गेल्या तीन महिन्यांपासून रिक्त असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील पद रिक्त असल्याने तेथील रुग्णांची गैरसोय होत आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील रिक्त पद तातडीने भरण्याबाबत शासन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
ग्रामीण रुग्णालय, आटपाटी येथें क्ष किरण तंत्रज्ञाचे पद रिक्त असले तरी ग्रामीण रुग्णालय भिवघाट करंजे रुग्णालयातील क्ष किरण तंत्रज्ञास दोन दिवस प्रतिनियुक्ती देण्यात आली आहे. त्यामुळे रुग्णांची गैरसोय होत नाही.
(३) दि. ०७.१२.२०१६ रोजी उपसंचालक आरोग्य सेवा कोल्हापूर मंडळातील गट क संवर्गातील १६१ पदांची जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. त्यामध्ये २३ क्ष किरण तंत्रज्ञांची रिक्त पदे भरण्यात येणार आहेत. दि २०.०६५.२०१८ रोजी परिक्षेचे नियोजन करण्यात आले होते. लेखी परिक्षेस उपस्थित असलेल्या उमेदवारांची गुणवत्तायादी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. लवकरच निवडयादी प्रसिध्द करण्याची व निवडयादीतील उमेदवारांमधून ग्रामीण रुग्णालय, आटपाडी येथे समुपदेशाद्‌वारे पदस्थापना देण्याची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### औसा रेणापूर व मुरड (जि.लातूर) येथे ट्रामा केअर सेंटर मंजुरीबाबत

**(३१) १०८९६६ (३१-०३-२०१८). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औसा, रेणापूर व मुरुड (जि.लातूर) येथील ग्रामीण रुग्णालयात अत्यवस्थ व गंभीर रुग्णांना उपचाराची कोणतीही सुविधा नसल्याने सदर ठिकाणी ट्रामा केअर सेंटर मंजुरी व आवश्यक निधीची तरतुद करण्याबाबत लातूर ग्रामीण लोकप्रतिनिधीनी दिनांक २० जानेवारी २०१८ रोजी वा त्यासुमारास झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मा.पालकमंत्री यांच्याकडे मागणी केली व त्याबाबतचा ठरावही जिल्हा नियोजन समिती, लातूर यांनी घेतला आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास सदर ट्रामा केअर सेंटर च्या कामासाठी किती निधीची आवश्कता असून सदर निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास सदर ठिकाणी ट्रामा केअर सेंटर मंजुरीबाबत शासनास किती कालावधी लागेल,

(४) कोणतीही कार्यवाही केली नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०२-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

औसा व रेणापूर येथील ग्रामीण रुग्णालय येथे ट्रामा केअर सेंटर मंजूर करण्याची मागणी करण्यात आली आहे. ग्रामीण रुग्णालय मुरुड येथे ट्रामा केअर सेंटर मंजूर आहे.

(२) ग्रामीण रुग्णालय मुरुड येथील ट्रामा केअर सेंटरच्या इमारत बांधकामासाठी नकाशे व अंदाजपत्रक यास प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) सन २०११ च्या लोकसंख्येवर आधारित नविन आरोग्य संस्थांचे स्थान निश्चित करण्यासाठी जोडबृहत आराखडा तयार करण्यात येत असून, औसा व रेणापूर येथील ग्रामीण रुग्णालयामध्ये ट्रामा केअर युनिट स्थापित करण्याची मागणी, निकषानुसार जोडबृहत आराखडयामध्ये समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबई महापालिकेतुन १४ गाव वगळण्यात आल्यानंतर नावाळी येथील प्राथमिक आरोग्य केंद्र जिल्हा परिषदेकडे वर्ग करुन रुग्णालय सुरु करण्याबाबत

**(३२) ११०२०२ (१०-०४-२०१८). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई महापालिकेतुन १४ गाव वगळण्यात आल्यानंतर नावाळी येथील प्राथमिक आरोग्य केंद्र बंद अवस्थेत असल्याने नागरीकांना आरोग्यविषयक अडचणीं येत असून सदरचे आरोग्य केंद्र जिल्हा परिषदेकडे वर्ग करुन रुग्णालय सुरु करण्याची लोकप्रतिनिधींनी दिनांक १० जानेवारी, २०१८ वा त्यासुमारास रोजी जिल्हा नियोजन बैठकीमध्ये मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी केलेली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, उक्त प्रश्नी अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०२-२०१९) :** (१) व (२) दि. १०.०१.२०१८ च्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मा. लोकप्रतिनिधीनी मागणी केली आहे, हे खरे आहे. नावाळी येथील आरोग्य केंद्राची इमारत, नवी मुंबई महापालिकेने बांधली असून सद्या ही गावे महापालिकेतून वगळल्याने इमारत विनावापर पडून आहे. त्यामुळे तेथील नागरिकांना वैद्यकीय सुविधा पुरविण्याकरिता प्राथमिक आरोग्य केंद्र निळजे चे स्थलांतर नावाळी येथे करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

तसेच नवी मुंबई महानगर पालिकेच्या अधिपत्याखालील नावाळी येथील इमारत जिल्हा परिषद, ठाणे यांचेकडे वर्ग करण्याबाबत पत्रव्यवहार करुन पाठपुरावा करण्यात येत आहे.
(३) सद्यस्थितीत नावाळी व इतर १४ गावांना आरोग्य विषयक आवश्यक त्या सेवा प्राथमिक आरोग्य केंद्र, निळजे यांचेमार्फत पुरविल्या जात आहेत.

---

### कोल्हापूर जिल्हयात जिल्हापरिषदेच्या आरोग्य विभागाकडून डेग्यूच्या प्रतिबंधाकरिता वाटप करण्यात आलेल्या मच्छरदाण्याबाबत

**(३३) ११०६९८ (०५-०४-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हयात जिल्हापरिषदेच्या आरोग्य विभागाकडून डेग्यूच्या प्रतिबंधाकरिता वाटप करण्यात आलेल्या मच्छरदाण्याची मुदत माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये संपलेली असतांना सदर मच्छरदाण्याचे वाटप करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वात्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) याबाबत चौकशी केली असता, कोल्हापूर जिल्हयातील हिवतापग्रस्त वडणगे प्रा.आ.केंद्राच्या कार्यक्षेत्रात ४३०० किटकनाशक भारित मच्छरदाण्यांचे वाटप शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनूसार नियोजनबध्दरित्या करण्यात आले आहे. तदनंतर कोल्हापूर जिल्हयातील आंबेवाडी गावात सुध्दा हिवतापाचे रुग्ण आढळल्याने दि.१४.११.२०१७ ते दि.२३.११.२०१७ या कालावधीत शारीरिक प्रतिबंध (Physical Barrier) म्हणून २६५० मच्छरदाण्यांचे वाटप करण्यात आले असून सदर मच्छरदाण्यांचा नियमित वापर होत असल्याचे आढळून आले आहे.

(३) चौकशी अंती शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनूसार व नियमानुसार किटकनाशक भारित मच्छरदाण्यांचे वाटप केले असल्याने कारवाईचा प्रश्न उदभवत नाही
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बीड येथील जिल्हा रुग्णालयात डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे रुग्णाचा झालेला मृत्यू**

**(३४) १११६७२ (१०-०४-२०१८). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड येथील जिल्हा रुग्णालयात डॉक्टरांनी आपल्या खासगी रुग्णालयातील रुग्णाला वाचविण्यासाठी श्री.कृष्णा ज्ञानदेव लांडगे या रुग्णाला आयसीयुमधुन बाहेर काढल्यामुळे त्याचा मृत्यु झाला असल्याचे दिनांक १४ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे या रुग्णांच्या नातेवाईकांनी या मृत तरुणांचा मृतदेह बीड शहर पोलीस ठाण्यात नेऊन संबंधित डॉक्टरांवर कारवाईची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात शासनाने सखोल चौकशी करुन संबंधित डॉक्टरांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) रूग्णाच्या नातेवाईकांनी डॉक्टरांवर कारवाई करण्याची मागणी पोलीसांकडे केली आहे. या प्रकरणी जिल्हा रूग्णालयातील त्रिसदस्यीय समितीमार्फत चौकशी करण्यात आलेली आहे. रूग्ण कृष्णा ज्ञानदेव लांडगे याने विष प्राशन केल्यामुळे त्याला दि.३.११.२०१७ रोजी अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले होते. त्याचेवर उपचार झाल्यानंतर त्याची प्रकृती स्थिर झाल्यामुळे त्याला दि.६.११.२०१७ रोजी सेमी आयसीयुमध्ये हलविण्यात आले व तेथे त्यावर दि.८.११.२०१७ पर्यंत उपचार करण्यात आले. विषप्राशनामुळे त्याचे Acute liver failure होऊ शकते याबाबत आगाऊ कल्पना त्याच्या नातेवाईकांना देण्यात आलेली होती. त्याचे Acute liver failure बळावल्यामुळे दि.८.११.२०१७ रोजी सकाळी वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद येथे पुढील उपचारासाठी संदर्भित करण्यात आले. पुढे सदर रूग्णाचा दि.१२.११.२०१७ रोजी मृत्यू झाला आहे.

या दरम्यान खाजगी रूग्णालयातून संदर्भित करण्यात आलेल्या श्रीमती उज्वला शेळके हिला प्रसूतीनंतर उच्च रक्तदाब (Eclampsia) मुळे व रक्तस्त्राव होत असल्याने अतिदक्षता विभागात दाखल करण्याची आवश्यकता निर्माण झाल्याने वर नमूद केल्याप्रमाणे रूग्ण कृष्णा लांडगे याची प्रकृती स्थिर असल्यामुळे त्याला सेमी आयसीयुमध्ये हलविण्यात आले व त्याचे जागी उपरोक्त महिलेवर उपचार करण्यात आले.सदर महिला रुग्ण खाजगी प्रसुतीगृहातून दाखल करण्यात आलेली असली तरी सदर रुग्णालय जिल्हा रुग्णालय, बीड

येथील कोणत्याही वैद्यकीय अधिकाऱ्याचे नाही. रुग्ण कृष्णा लांडगे याच्या उपचारात जिल्हा रुग्णालय, बीड येथील वैद्यकीय अधिकाऱ्याकडुन कोणताही हलगर्जीपणा झालेला नसल्याचे समितीच्या अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे संबंधित डॉक्टरांवर सदोष मनुष्यवदाचा गुन्हा दाखल करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुंडलवाडी (ता.बिलोली, जि.नांदेड) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे ग्रामीण रुग्णालयामध्ये श्रेणी वर्धन करण्याबाबत**

**(३५) ११२०२२ (०१-०४-२०१८). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुंडलवाडी (ता.बिलोली, जि.नांदेड) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे ग्रामीण रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्याबाबत लोकप्रतिनिधीने माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्राथमिक आरोग्य केंद्राचे ग्रामीण रुग्णालयांत श्रेणीवर्धन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) कुंडलवाडी, ता.बिलोली, जि.नांदेड येथे नविन ग्रामीण रुग्णालय स्थापन करण्यास शासनाच्या दि.१३.११.२०१८ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात प्रधानमंत्री महिला शक्ति केंद्र योजना सुरु करण्याचा निर्णय**

**(३६) ११२२६६ (०४-०४-२०१८). श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनाने प्रधानमंत्री महिला शक्ति केंद्र योजना सुरु करण्याचा निर्णय माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास,सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी शासनाने कोणत्या अटी व शर्थी घातल्या आहेत काय,

(४) असल्यास, त्या काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०२-२०१९) :**१) होय, केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार “महिला शक्ती केंद्र” योजना राज्यामध्ये सुरु करण्याचे प्रस्तावित आहे.
(२) “महिला शक्ती केंद्र” या योजनेअंतर्गत विद्यार्थी / स्वयंसेवक यांच्यामार्फत ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणासाठी शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या कौशल्य विकासाच्या विविध योजना/ कार्यक्रम व प्रशिक्षणासंदर्भात ग्रामीण स्त्रियांना त्यांच्या अधिकारांचा लाभ घेण्यासाठी सरकारकडे जाण्यासाठी राज्य, जिल्हा आणि ब्लॉक पातळीवर महिलांच्या सक्षमीकरणाच्या दृष्टीने एक यंत्रणा उपलब्ध करण्याचे प्रस्तावित आहे.
(३) “महिला शक्ती केंद्र” योजना राज्यामध्ये सुरु करण्याचे प्रस्तावित असून अद्याप अटी व शर्ती निश्चित नाहीत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद -सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील पाचोड येथील ट्रामा केअर सेंटर बंद असल्याबाबत**

**(३७) ११२४१० (०१-०४-२०१८). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद -सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील पाचोड येथील ट्रामा केअर सेंटर चार वर्षापासून विनावापर पडून असल्याचे माहे जानेवारी २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त सेंटर अदयाप सुरु न झाल्याने सदर रस्त्यावर अपघात झाल्यास रुग्णांना घाटी रुग्णालयात नेईपर्यंत अनेकांना जीव गमवावे लागल्याच्या घटना घडल्या आहेत, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, तदनुसार उक्त ट्रामा केअर सेंटर तात्काळ सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.
सार्वजनिक बांधकाम विभागाने ट्रामा केअर युनिट, पाचोड येथील इमारतीची प्रलंबित कामे पूर्ण करुन दिलेली नसल्यामुळे, ग्रामीण रुग्णालय, पाचोड येथील ट्रामा केअर युनिटची इमारत ताब्यात घेण्यात आलेली नाही.
(२) हे खरे नाही.
(३) ग्रामीण रुग्णालय, पाचोड येथे अपघातग्रस्त रुग्णांवर तातडीने उपचार केले जातात. गंभीर स्वरुपाच्या रुग्णांना वरीष्ठ रुग्णालयात टोल फ्री क्र.१०८ या रुग्णवाहिकेने संदर्भित करण्यात येते.

(४) सार्वजनिक बांधकाम विभागास अपुर्ण कामे पुर्ण करण्याकरीता वेळोवेळी जिल्हा शल्य चिकित्सक, औरंगाबाद कार्यालयाने पत्र व्यवहार केलेला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### जिल्हा रुग्णालय परभणी (जि.परभणी) येथील स्त्री रुग्णालयाची झालेली दुरवस्था

**(३८) ११४११९ (०६-०४-२०१८). श्री.विजय भांबळे (जिंतूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिल्हा रुग्णालय परभणी (जि.परभणी) येथील स्त्री रुग्णालयाची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर स्त्री रुग्णालयाची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यानुसार स्त्री रुग्णालयासाठी स्वतंत्र इमारत वा इतर व्यवस्था करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०२-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.
स्त्री रुग्णालय, हे जिल्हा रुग्णालयाच्या सध्याच्या इमारतीत सुरु आहे.
(२) होय.
स्त्री रुग्णालयाच्या इमारतीकरीता २.६५ एकर स्वतंत्र जागा उपलब्ध झाली असुन, राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत आराखडे व अंदाजपत्रकाबाबत आणि निधी उपलब्ध करुन घेण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### तळेरे, कणकवली आणि सावंतवाडी (जि.सिंधुदूर्ग) येथील मंजूर ट्रामा केअर सेंटर्स कार्यान्वित करण्याबाबत

**(३९) ११५२५६ (०१-०४-२०१८). श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कणकवली आणि सावंतवाडी (जि.सिंधुदर्ग) ट्रामा केअर सेंटर्स बांधून तयार असून येथे आवश्यक असणाऱ्या मनुष्यबळासही शासनाने मान्यता दिलेली असून तळेरे येथील ट्रामा केअर सेन्टर्ससाठी जागा उपलब्ध झालेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कणकवली व सावंतवाडी येथील ट्रामा केअर सेंटर्समधील पदभरती आणि साधनसामुग्री उपलब्धतेबाबतची तसेच तळेरे येथील ट्रामा केअर्स सेन्टर्सच्या जागा उपलब्ध करून घेण्याबाबतची सद्यस्थिती काय आहे,

(३) असल्यास, मुंबई - गोवा महामार्गावरील दिवसेदिवस वाढत असलेल्या अपघातांचे प्रमाण लक्षात घेता सदरहू ट्रामा केअर्स सेंटर्स कार्यान्वित करण्यात किती कालावधी अपेक्षित आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०२-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

कणकवली व सावंतवाडी या उपजिल्हा रुग्णालयाच्या ठिकाणी ट्रामा केअर सेंटर्स बांधून तयार असून तेथे आवश्यक असणाऱ्या मनुष्यबळासही शासनाने मान्यता दिलेली आहे. तळेरे येथे ग्रामीण रुग्णालय व ट्रामा केअर युनिटसाठी अद्याप जागा उपलब्ध झालेली नाही.
(२), (३) व (४) कणकवली व सावंतवाडी या ठिकाणी पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. काही प्रमाणात साधनसामुग्री पुरवठा करण्यात आलेला आहे. पदभरतीची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर व उर्वरित साधनसामुग्रीचा पुरवठा केल्यानंतर येथील ट्रामा केअर युनिट तातडीने सुरु करण्यात येतील. तळेरेच्या जागा उपलब्धतेसाठी जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग, तहसिलदार कणकवली, सरपंच, ग्रामपंचायत तळेरे यांचेकडे पत्रव्यवहार केला असून पाठपुरावा सुरु आहे.

---

**चिळणी तिवसपाडा (ता.डहाणू, जि.पालघर) या दूर्गम भागात**
**प्राथमिक आरोग्य पथकाच्या कामकाजाबाबत**

**(४०) ११५४६१ (०६-०४-२०१८). श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिळणी तिवसपाडा (ता.डहाणू, जि.पालघर) या तालुक्याच्या दुर्गम भागातील अत्यावश्यक सेवा प्राथमिक आरोग्य पथकाचे कामकाज दर रविवारी बंद असल्यामुळे ग्रामीण भागातील रुग्णांचे मोठी गैरसोय होत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, तदनुसार यासदंर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.
प्राथमिक आरोग्य पथक, चिळणी येथे रविवारी आरोग्य सेविका मुख्यालयी वास्तव्य करुन रुग्णांवर उपचार करतात. आवश्यकता भासल्यास रुग्णांना संदर्भ सेवा दिली जाते.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवतमाळ, नंदूरबार मध्ये कर्करोगाचे व नांदेड व किनवटमध्ये अर्धांगवायूचे प्रमाण सर्वाधिक असल्याबाबत**

**(४१) ११८६६७ (०१-०८-२०१८). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ, नंदूरबार मध्ये कर्करोगाचे व नांदेड व किनवटमध्ये अर्धांगवायूचे प्रमाण सर्वाधिक असल्याचे महाशिबीराच्या माध्यमातून माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून शासकीय आरोग्य व्यवस्था रुग्णांपर्यंत पोहोचत नसल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, राज्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेची स्थिती सुधारण्यासाठी राज्य शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) राज्यामध्ये आरोग्य विषयक स्थिती सुधारण्यासाठी राज्य शासनामार्फत राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत पुढीलप्रमाणे विविध कार्यक्रम राबविण्यात येतात.

१) असंसर्गजन्यरोग निवारण कक्ष :सदर विभागामार्फत राष्ट्रीय कर्करोग, मधुमेह, ह्दयरोग व पक्षाघात प्रतिबंधक व नियंत्रण कार्यक्रमांतर्गत मधुमेह, ह्दयरोग व पक्षाघात प्रतिबंधक व नियंत्रण या सेवा राज्यातील ३४ जिल्हा रुग्णालयात दिल्या जातात.

२) युनिव्हर्सल स्क्रिनिंग कार्यक्रमांतर्गत एकूण १६ जिल्ह्यांत ३० वर्षावरील सर्व स्त्री-पुरुषांची गावपातळीवर मधुमेह, रक्तदाव, मुखकर्करोग, गर्भाशय मुखकर्करोग आणि स्तन कर्करोगाची तपासणी कार्यक्रम सन २०१८-१९ पासून राबविण्यात येणार आहे.

३) माहे डिसेंबर, २०१७ मध्ये राज्यभरात मुख स्वास्थ अभियानामध्ये २.१४ कोटी रुग्णांची मौखिक पूर्व तपासणी केली. २.६२ लक्ष विविध लक्षणांचे रुग्ण पुढील तपासणीसाठी तज्ञांकडून फेरतपासणी करुन घेण्यासाठी संदर्भित करण्यात आले. त्यापैी संदर्भसेवा पुर्ण झाल्यानंतर २००८ इतके रुग्ण बायोप्सी ग्राह्य असल्याने त्यांची बायोप्सी घेण्यात येत आहे.

४) राज्यात कॅन्सर वॉरिअर उपक्रमांतर्गत कॅन्सरच्या सेवा पुरविण्यात येतात. या व्यतिरिक्त माता बाल आरोग्य विभागांतर्गत खालील प्रकारच्या विविध सेवा राज्यात उपलब्ध आहेत. या विभागामार्फत माता आरोग्य सेवा, आलआरोग्य सेवा, नियमित लसीकरण सेवा, कुटुंबनियोजन सेवा आणि किशोरवयीन कार्यक्रम अंतर्गत १० ते १९ वयोगटातील मुला मुलींना समुपदेशन सेवा इ. सेवा पुरविण्यात येतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाडेबोल्हाई (ता.हवेली, जि.पुणे) येथील प्राथमीक आरोग्य केद्रामध्ये रुग्णाची होत असलेली गैरसोय**

**(४२) १२३८४९ (२५-०७-२०१८). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडेबोल्हाई (ता.हवेली, जि.पुणे) येथिल प्राथमीक आरोग्य केद्रामध्ये रूग्णाची गैरसोय होत असल्याबाबतच्या तक्रारी जिल्हा परिषद सदस्यांनी अनेक वेळा जिल्हा आरोग्य अधिकारी, पुणे यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्राथमीक आरोग्य कैंद्रामध्ये नसबंदी शस्त्रक्रिया केलेल्या स्त्रियांना एका हॉलमध्ये जमीनीवर झोपविण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तेथील वैद्याकिय अधिकारी व इतर रिक्त पदे त्वरित भरण्याबाबत सुध्दा अनेक वेळा मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, त्यानुसार सदर प्राथमिक आरोग्य केद्रात येणा-या रुग्णंची गैरसोय होऊ नये व तेथील रिक्त पदे त्वरित भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०२-२०१९) :** (१) व (२) हे खरे आहे.

वाडेबोल्हाई, ता. हवेली येथील प्राथमिक आरोग्य कैंद्रामध्ये सहा रुग्णांसाठी बेड उपलब्ध आहेत. तथापि शस्त्रक्रियेच्यावेळी रुग्णांची संख्या सहापेक्षा आधिक असल्यास रुग्णांची गैरसोय होणार नाही अशा पध्दतीने शस्त्रक्रियेनंतर रुग्णांची व्यवस्था करण्याबाबत दक्षता घेण्यात येते.

(३) हे खरे नाही.

वैद्यकिय अधिका-यांची दोन्ही पदे भरलेली असून कर्मचा-यांचे १२ पैकी १० पदे भरलेली असून दोन पदे रिक्त आहेत.

(४) पश्न उद्‌भवत नाही.

(५) रुग्णांची गैरसोय होवू नये म्हणून वैद्यकिय अधिकारी व तांत्रिक कर्मचारी यांना आरोग्य सेवा संचालनालयाच्या स्तरावरुन सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच रिक्त पदभरतीची कार्यवाही जिल्हा परिषदेमार्फत सुरु आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आष्टी (जि.बीड) येथील ट्रामा केअर सेंटर सुरु करण्याबाबत**

**(४३) १२४०७८ (०६-०८-२०१८). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आष्टी (जि.बीड) तालुक्यातील ट्रामा केअर सेंटर्सच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असून केवळ रिक्त असलेल्या कर्मचारी/अधिकारी यांच्या पदांमुळे आणि अत्याधुनिक यंत्रसामुग्री उपलब्ध नसल्याने सदरहू ट्रामा केअर सेन्टर्स आजमितीपर्यंत कार्यान्वित झाले नसल्याची बाब माहे जून २०१८ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, आष्टी तालुक्यातील ट्रामा केअर सेंटर्स कार्यान्वित करण्यासाठी साठी आवश्यक कर्मचारी/अधिकारी यांची रिक्त पदे भरण्याबाबत, तसेच अत्याधुनिक यंत्रसामुग्री उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. एकनाथ शिंदे (२५-०२-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) दिनांक १६ फेब्रुवारी, २०१८ च्या शासन निर्णयान्वये मंजुर केलेल्या १६५ पदांपैकी तीन पदे भरण्यात आली आहेत. उर्वरित रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर ट्रामा केअर युनिटमध्ये आवश्यक यंत्रसामुग्री पुरवठयासाठी मे.हाफकिन, मुंबई यांचेकडे मागणी नोंदविलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाटोदा व मोहपूर (ता.किनवट-माहुर, जि.नांदेड) या आदिवासी व नक्षलग्रस्त भागात नविन प्राथमिक आरोग्य केंद्र स्थापन करण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(४४) १२५३०७ (०१-०८-२०१८) श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.विजय भांबळे (जिंतूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) पाटोदा व मोहपूर (ता.किनवट-माहुर, जि.नांदेड) या आदिवासी व नक्षलग्रस्त भागात नविन प्राथमिक आरोग्य केंद्र स्थापन करण्याचा प्रस्ताव मागील ७-८ वर्षापासून प्रस्तावीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन नियमानुसार आदिवासी व नक्षलग्रस्त भागात १० ते १६५ हजार लोकसंख्येवर एक प्राथमिक आरोग्य केंद्र असावे असा नियम असताही या भागात ४० ते ६५६५ हजार लोकसंख्या असूनही प्राथमिक आरोग्य केंद्र स्थापन करण्याचा प्रस्ताव अद्याप प्रलंबीत असण्याची कारणे काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार नांदेड जिल्ह्यातील पाटोदा व मोहपूर या आदिवासी भागात प्रस्तावित प्राथमिक आरोग्य केंद्राला मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०२-२०१९) :** (१), (२), (३) व (४) आदिवासी/डोंगरी/नक्षल भागासाठी दर २०,००० लोकसंख्येस १ प्राथमिक आरोग्य केंद्र स्थापन करण्याचे शासनाचे धोरण आहे. सन २०११ च्या लोकसंख्येवर आधारित नवीन रुग्णालय सुरु करण्यासाठी जोड-बृहत आराखडा तयार करण्यात येत असून नांदेड जिल्हयातील पाटोदा व मोहपूर या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र सुरु करण्याची मागणी निकषानुसार जोड-बृहत आराखडयामध्ये समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिंधुदुर्ग जिल्हयाकरीता आरोग्यविषयक सेवा - सुविधा पुरविण्यासंदर्भात प्राप्त झालेला निधी खर्च न झाल्याबाबत

**(४५) १२८०३५ (१०-१२-२०१८). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदूर्ग जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागास राज्यशासनाकडून तसेच इतर विविध मार्गाने जिल्ह्यात आरोग्यविषयक सेवा-सुविधा पुरविण्यासंदर्भात सन २००८-२००९ ते सन २०१७-२०१८ या कालावधीत प्राप्त झालेल्या निधीतून प्रत्यक्षात निधी खर्चच झालेला नसल्याने सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विशेषेकरून दुर्गम व डोंगराळ भागातील तसेच गोरगरीब रुग्णांना आरोग्य सेवेपासून वंचित राहावे लागत असून औषधोपचारा अभावी अनेक रुग्णांचा मृत्यू झालेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सिंधुदूर्ग जिल्हयाकरीता उपरोक्त कालावधीत किती निधी प्राप्त झाला व प्राप्त झालेल्या निधीतून प्रतिवर्षी प्रत्यक्षात किती निधी खर्च करण्यात आलेला आहे,
(३) असल्यास, सिंधुदूर्ग जिल्ह्यातील जिल्हापरिषद आरोग्य सेवेला उपरोक्त कालावधीत प्राप्त झालेला निधी खर्च न होण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,
(५) असल्यास, त्यानुसार उक्त कालावधीत सिंधुदुर्ग जिल्हयाकरीता आरोग्यविषयक सेवा - सुविधा पुरविण्यासंदर्भात प्राप्त झालेला निधी खर्च न करणा-या संबधितावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०२-२०१९) :** (१) अंशतः खरे आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात सन २००८-०९ ते सन २०१७-१८ या वर्षात प्राप्त निधीपैकी काही निधी विविध प्रशासकीय व तांत्रिक कारणामुळे अखर्चीत राहीला आहे, हे खरे आहे. तथापि, त्यामुळे जिल्ह्यातील गोरगरीब रुग्णांना आरोग्य सेवा पुरविण्यात कोणतीही अडचण आलेली नाही. तसेच, शासकीय रुग्णालयात औषधोपचारा अभावी कोणताही रुग्ण मृत्युमुखी पडलेला नाही.

(२) सिंधुदूर्ग जिल्ह्याकरीता सन २००८-०९ ते सन २०१७-१८ या कालावधीत प्राप्त झालेला व खर्च झालेला निधी खालीलप्रमाणे आहे.

(रु.लाखात)

| वर्ष | प्राप्त अनुदान | खर्च अनुदान |
|---|---|---|
| २००८-२००९ | १५१.६१ | १४९.८० |
| २००९-२०१० | १२१.८७ | ११४.२० |
| २०१०-२०११ | ११६.६७ | १११.७८ |
| २०११-२०१२ | ४५८.१६ | ४४९.७३ |
| २०१२-२०१३ | २९९.४० | २९२.३८ |
| २०१३-२०१४ | १४९.६३ | १४९.६३ |
| २०१४-२०१५ | २५३.४८ | २५३.४४ |
| २०१५-२०१६ | २१०.३२ | २१०.३२ |
| २०१६-२०१७ | २२३.९५ | २२३.९१ |
| २०१७-२०१८ | २१९.७० | २१९.७० |
| एकूण | २२०४.७९ | २१७४.८९ |

वरील प्राप्त निधी हा औषधे व साहित्य खरेदी, उपकरणे व सामुग्री, रुग्णालये बांधकाम याकरिता वितरीत केलेला होता.

(३) जागेबाबतची न्यायालयीन प्रकरणे उद्भवल्याने, बांधकामाची देयके वेळीच प्राप्त न झाल्यामुळे, जागा निश्चितीस उशिर झाल्यामुळे, ई-टेंगरींगला पुरेसा प्रतिसादर न मिळाल्यामुळे इ.प्रशासकीय कारणामुळे खर्च होवू शकलेला नाही. तसेच दरकरारावरील औषधांचा पुरवठादाराकडून पुरवठा वेळेत न झाल्याने बांधकामाबाबतचा व औषधांबाबतचा निधी अखर्चित राहिला.

(४) व (५) प्रशासकीय कारणांमुळे निधी खर्च न झाल्यामुळे कोणावरही कारवाई करण्याची आवश्यकता भासली नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यातील आरोग्य उपकेंद्र बंद असल्यामुळे रुग्णांची होत असलेली गैरसोय

**(४६) १२९६१२ (११-१२-२०१८). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यातील आरोग्य उपकेंद्र नेहमीच बंद असल्यामुळे रुग्णांची गैरसोय होत असून त्यांना खर्च परवडत नसतानासुध्दा खाजगी रुग्णालयात जावे लागत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार सदरहू रुग्णालय पूर्ववत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०२-२०१९) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी तालुक्यातील उपकेंद्रांतर्गत येणाऱ्या ४ ते ५ गावांना लसीकरण तसेच क्षेत्रभेटीसाठी आरोग्य सेविका व आरोग्य सेवक यांना जावे लागते. तसेच जिल्हा स्तरावर, तालुका स्तरावरील मासिक बैठका व इतर अनुषंगीक योजनांच्या अनुषंगाने बैठका आयोजित करण्यात येतात. सदर बैठकांना त्यांना उपस्थित रहावे लागते. अशा परिस्थितीत उपकेंद्र बंद असण्याची शक्यता नाकारता येत नाही. परंतु उपकेंद्र स्तरावर देण्यात येणाऱ्या आरोग्य सेवा रुग्णांना देण्यात येतात.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### कौठा (जि.हिंगोली) येथील आरोग्य उपकेंद्राच्या इमारतीची झालेली दुरवस्था

**(४७) १३०७४६ (११-१२-२०१८). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कौठा (जि.हिंगोली) येथील आरोग्य उपकेंद्राच्या इमारतीची दुरवस्था झालेली असून तेथे संरक्षण भिंत नसल्यामुळे इमारतीच्या आवारात गुरे व जनावरे आढळून येत असल्याचे माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आरोग्य उपकेंद्राच्या परिसरात वाढलेली झाडे व झुडपे, गवत व साचत असलेल्या घाणीमुळे तेथील कर्मचाऱ्यांसह रुग्णांना देखील त्रास होत असून त्याठिकाणी पावसाळ्यात जागोजागी पावसाचे पाणी गळत असून दुर्गंधीमुळे नाकाला रूमाल लाऊनच रुग्णांवर उपचार करावे लागत असल्याचे देखील निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी आरोग्य विभागाने केलेले दुर्लक्ष व सदर बाब वेळीच शासनाला कळविली नसल्यामुळे सदर इमारतीची दूरावस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०२-२०१९) :** (१) हे अंशत: हे खरे आहे.

सन २००८-०९ मध्ये मौजे कौठा ता.वसमत येथील उपकेंद्राच्या दुरुस्तीचे काम एनएचएम अंतर्गत करण्यात आले होते. कौठा आरोग्य उपकेंद्राच्या इमारतीस संरक्षण भिंत नसल्यामुळे इमारतीच्या आवारात गुरे व जनावरे आढळून येतात.
(२) हे खरे नाही.

सदर उपकेंद्रात सन २०१८ मधील उपलब्ध निधी मधून आवारातील झाडे, झुडपे व परिसर स्वच्छता करुन खड्डे असलेल्या ठिकाणी मुरुम टाकण्यात आलेला असल्यामुळे पावसाचे पाणी साचून राहत नाही. तसेच पाण्यामुळे दुर्गंधी येत नाही.

(३) हे खरे नाही.

कौठा उपकेंद्राच्या इमारतीची दुरावस्था झालेली नाही. सदर उपकेंद्रात येणाऱ्या रुग्णांना सर्व आरोग्य सेवा पुरविण्यात येत असून उपकेंद्रात प्रसूती करण्यात येते.

(४) मौजे कौठा, ता.वसमत येथील आरोग्य उपकेंद्रास हेल्थ वेलनेस सेंटर योजने अंतर्गत एनएचएम मधून सन २०१८-१९ मध्ये रु.७.०० लक्ष निधी मंजूर असून उपकेंद्र नुतनीकरण करणेबाबत कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सुकटा (ता.भूम, जि.उस्मानाबाद) येथील प्राथमिक आरोग्य केंद्र बंद असल्यामुळे रुग्णची होत असलेली गैरसोय

**(४८) १३२०४७ (११-१२-२०१८). श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मु.पो.सुकटा (ता.भूम, जि.उस्मानाबाद) येथील प्राथमिक आरोग्य केंद्र मागील सहा महिन्यांपासून बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील आरोग्य केंद्रात अनेक आजारांवर उपचार होत असून ते बंद असल्याने आजूबाजूच्या गावातील लोकांची गैरसोय होत असल्याने प्राथमिक आरोग्य केंद्र लवकरात लवकर सुरु करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.ग्रामविकास मंत्री यांचेकडे दिनांक १६ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पत्राच्या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.

मु.पो.सुकटा (ता.भुम, जि.उस्मानाबाद) येथे प्राथमिक आरोग्य कार्यान्वित नसून सदर ठिकाणी नागरी दवाखाना कार्यान्वित आहे.

(२) हे खरे नाही.

उस्मानाबाद जिल्ह्यातील सुकटा येथील नागरी दवाखान्यात कार्यरत वैद्यकीय अधिकारी यांची दि.१०.१०.२०१७ च्या शासन आदेशान्वये प्राथमिक आरोग्य केंद्र मान, जि.पुणे येथे विनंती बदली झाल्याने त्यांना दि.१६५.११.२०१७ रोजी उस्मानाबाद जिल्हा परिषदेमधून कार्यमुक्त करण्यात आले आहे.

सद्यस्थितीत सुकटा येथील नागरी दवाखान्यातील “वैद्यकीय अधिकारी” या पदाचा पदभार तात्पुरता “वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र वालवड, ता.भूम” यांचेकडे देण्यात आला आहे. त्यामुळे सदर दवाखाना बंद नाही व आरोग्य विषयक कामकाज नियमित चालू आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**येरवडा (जि.पुणे) येथील प्रादेशिक मनोरुग्णालयात रिक्त पदे असल्याबाबत**

**(४९) १३२८२६ (१०-१२-२०१८). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येरवडा (जि.पुणे) येथील प्रादेशिक मनोरुग्णालयात रुग्णाची संख्या वाढत असल्याने तेथे कर्मचारी वर्ग अपुरा पडत असल्याने रुग्णाकडे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मनोरुग्णालयासाठी आवश्यक असलेल्या अटेंडट या पदाच्या २५ टक्के जागा रिक्त असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या रुग्णांपैकी काही जण जेलमधील कैदी असून ते काही प्रसंगी अटेंडटना मारहाण करीत असतात तसेच मनोरुग्णांना ज्या वेळी झटके येतात त्यावेळी त्यांना सांभाळण्यासाठी प्रशिक्षीत मनुष्यबळाची गरज असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रिक्त पदे भरण्याबाबत शासनाकडे वेळोवेळी पाठपुरावा करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, त्यानुसार रुग्णालयातील रिक्त पदे भरण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

प्रादशिक मनोरुग्णालय, येरवडा, पुणे येथील अटेडटची एकूण ५५२ पदे मंजूर असून त्यापैकी ३९५ पदे भरलेली आहेत.

(३) हे खरे आहे.

या करीता २४ तास पोलीस बंदोबस्त देण्याकरीता आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई व प्रादेशिक मनोरुग्णालय पुणे या कार्यालयाकडून पोलीस आयुक्त यांच्याकडे पाठपुरवठा करण्यात येत

(४) व (५) हे खरे आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून मनोविकारतज्ञ २० पदांची जाहिरात देण्यात आली असून पदभरतीची कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्ह्यातील देगलूर येथील ट्रामा केअर सेंटर बंद अवस्थेत असून बिलोली येथे ट्रामा केअर सेंटर उभारण्यात आले नसल्याबाबत**

**(५०) १३४११३ (११-१२-२०१८). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देगलूर-बिलोली (जि.नांदेड) या तालुक्यातील महामार्गावर वारंवार अपघात घडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देगलूर येथील ट्रामा केअर सेंटर बंद अवस्थेत असून बिलोली येथील ट्रामा केअर सेंटर अद्यापही उभारण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाकडे वेळोवेळी मागणी करण्यात येऊनही मागणी पूर्ण होत नसल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

ट्रामा केअर युनिट, देगलूर हे कार्यान्वित नाही. तथापि, उपजिल्हा रुग्णालय, देगलूर येथे रुग्णांना आवश्यक उपचार केले जातात. बिलोली येथे ट्रामा केअर सेंटर मंजूर नाही.

(४) ट्रामा केअर युनिट देगलूर येथे आवश्यक यंत्रसामुग्री उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे उर्वरित यंत्रसामुग्री उपलब्ध करण्याची कार्यवाही हाफकिन महामंडळाकडून सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.